# 2. पडिसद्दो



'पडिसद्‌दो' (प्रतिध्वनी) ही एक लोककथा असून डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर यांनी ती अर्धमागधीत रूपांतरित केली आहे. डॉ. खरवंडीकर हे संस्कृत व अर्धमागधी या विषयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक आहेत. संस्कृत काव्यलेखना व्यतिरिक्त त्यांनी काही संस्कृत व अर्धमागधी पाठ्यपुस्तकांचेही संपादन केले आहे. 'संस्कृत पंडित' म्हणून महाराष्ट्र शासनाने त्यांचा गौरव केला आहे. त्यांना मिळालेल्या अनेक पुरस्कारांपैकी एन. सी. इ. आर. टी. चे दोन आणि आकाशवाणीचे दोन हे मुख्य पुरस्कार होत. शास्त्रीय संगीताचाही त्यांचा व्यासंग आहे.

परमेश्वराकडे मागणे मागताना ज्याचा जसा भाव असेल तसे त्याला फळ मिळते. हे सत्य पाठातील तीन लोकांच्या उदाहरणांवरून दिसून येते. म्हणून प्रत्येकाने मनात नेहमी चांगलेच भाव ठेवावेत असे या पाठातून स्पष्ट केलेले आहे.

आसि कस्सि पि अहिट्ठाणे सिवालओवकंठे एगं मुहरं गोउरं। तत्थ गंतूण जो कोइ जं किं पि वयइ तस्स पडिसद्‌दो तहेव सुणइ। पडिसद्दाणुरोहेण फलं पावइ त्ति जणाणं वीसासो । अह एगया गामंतर-आगया तिण्णि जणा तस्सिं गोउरे कमेण गच्छिंसु । तेसिं एगो जीवण-जत्ताए उव्विग्गो णिरासाए तत्थ आगओ । बीओ लुद्धगो देवदंसणेण अहिगं दव्वं लहिस्सामि ति वियारेण तत्थ आगओ। तइओ उण णाणी साहगो नवरं मणसंति लहिउं सिवालयं पत्तो ।

तेसिं पढमो एगंते ईसरसुमरणं करिऊणताररवेण वयइ तव कए णाहं किं पि करिउं समत्थो । ता खमसु मं। तक्खणे पडिसद्दो उट्ठिओ। 'तव कए णाहं किं पि करिउं समत्थो। ता खमसु मं।' भयवओ इयं पडिवयणं आयण्णिऊण सो नरो, अहिगं दुक्खं आवण्णो चिंतेइ, 'अहो! ईसरो वि णाम असमत्थो, तत्थ का कहा साहारणजणस्स ।

बीओ लोलुओ नरो एवं भणइ । अहं तव कए किंचि दव्वं अवस्सं देमि । परं तुमं मए पहूयं धणं देज्ज। तओ पडिसद्दो वि तारिसो चेव समुट्ठिओ ।

तया विम्हिओ सो नरो चिंतेइ –'अहो, सयं भगवं महेसरो वि धणं जायइ। सो मे धणं दाउं कहं पहवेज्जा ।

अणंतरं तइओ नाणी साहगो विणएण भासइ – 'जं जं मम समीवे अत्थि तं तं सव्वं तव चेव। अहं ते दासो म्हि । तओ पडिसद्दो वि तहेव समुप्पण्णो । सो नाणी साहगो पीऊसगब्भं तं वयं णिसम्मं अच्चंतं परितुट्ठो समाणो अप्पाणं कयत्थं मण्णइ। अहवा सच्चं एवं उच्चइ।

जारिसी कामणा जस्स फलं लब्भइ तारिसं ।<br>
कुओ कडुय-बीयाओ भवेज्जा महुरं फलं ।।

## शब्दार्थ

**अहिट्ठाण** – नपुं (अधिष्ठान) स्थान, जागा<br>
**सिवालअ** – पुं (शिवालय) शंकराचे मंदिर<br>
**आयण्णिऊण** – (त्वान्त अ.) ऐकून<br>
**गोउर** – नपुं. (गोपुर) नगर किंवा किल्ल्यांचा दरवाजा<br>
**पडिसद्दाणुरोह** – पु. (प्रतिध्वनिरोप) प्रतिध्वनीच्या अनुरोधाने<br>
**वीसास** – पु. (विश्वास) श्रद्धा, विश्वास<br>
**गामंतर-आगय** – वि (ग्रामान्तरागत) दुसऱ्या गावाहून आलेला<br>
**पहव** – क्रि. (प्रभव) समर्थ असणे.<br>
**साहग** – पु. (साधक) साधना<br>
**समीवे** – अ. (समीप) जवळ असणे<br>
**उव्विग्ग** – वि. (उद्विग्न) त्रासलेला, कंटाळलेला<br>
**णिरासा** – स्त्री (निराशा) निराशा पावलेला.<br>
**लुद्धग** – पुं (लुब्धक) लोभी<br>
**देवदंसण** – नपुं (देवदर्शन) देवाचे दर्शन<br>
**अहिगं** – अ (अधिकम) अधिक जास्त<br>
**दव्वं** – नपु (द्रव्य) संपत्ती. वैभव, पैसा<br>
**उट्ठिय** – वि.(उत्थित) उठला, उत्पन्न झाला.<br>
**उवकंठ** – नपुं. (उपकण्ठ) जवळ<br>
**मुहर** – वि. (मुखर) बोलके<br>
**साहारणजण** – (साधारणजन) सामान्य लोक<br>
**नर** – पु. (नर) माणूस<br>
**पहूय** – (प्रभूत), भरपूर खूप<br>
**महेसर** – पु (महेश्वर) महेश्वर<br>
**जायइ** – (याचति) याचना करणे.<br>
**कमेण** – पुं. (क्रमेण) क्रमाने, एकामागून एक<br>
**जीवणजत्ता** – स्त्री (जीवनयात्रा) आयुष्य<br>
**दास** – पुं. (दास) दास, गुलाम, सेवक<br>
**पीऊसगब्भं** – वि. (पीयुषगर्भम) अमृतासम<br>
**अच्चंतं** – अ (अत्यंत) अतिशय<br>
**परितुट्ठो** – कर्म भू. धा. वि. संतुष्ट<br>
**अप्पाणं** – पुं (आत्मानं) स्वत:ला.<br>
**कयत्थं** – वि. (कृतार्थम) धन्य, सफल<br>
**कामणा** – स्त्री (कामना) इच्छा<br>
**समत्थ** – वि. (समर्थ) समर्थ असणे.

**वियार** – पुं (विचार) विचार
**नाणी** – वि. (ज्ञानी) ज्ञान मिळविलेला
**मणसंति** – स्त्री (मन:शांती) मानसिक समाधान
**एगंत** – पु. एकान्त
**ईसरसुमरण** – नपु. ईश्वरस्मरण
**ताररव** – पु. (ताररव) उंच स्वर, मोठा आवाज
**करिऊण** – त्वान्त अव्यय (कृत्वा)
**तक्खणे** – अ (तत्क्षणे) त्याचक्षणी, तत्क्षणी
**खमं** – क्षमा
**जारिसी** – वि. (यादृशी) जशी
**कुओ** – अ (कुत:) कोठून
**कडुयबीयाओ** – नपु. (कटुकबीजात्) बियांपासून
**महुर** – वि (मधुर) गोड
**आवण्ण** – वि. (आपत्न), प्राप्त झाला.

## स्वाध्याय

### कृती करा

**1 खालील प्रश्नाची उत्तरे लिहा.**

1) शिवालयात कोण आले?
2) गोपुरात असलेल्या पहिल्या माणसाने कोणती याचना केली?
3) लोभी माणसाने देवाकडे काय मागितले.

**2 असे कोण म्हणाले.**

1) "जे जे माझे आहे, ते ते सर्व तुझेच आहे." [ ]
2) "मी तुझ्यासाठी काही करू शकत नाही, मला क्षमा करा." [ ]
3) "अरे रे ! ईश्वरही असमर्थ आहे." [ ]
4) "अहो, साक्षात भगवान महेश्वर धनाची याचना करत आहे." [ ]

**3 समानार्थी शब्द लिहा.**

1) ईसर – [ ]
2) सिव – [ ]
3) दव्वं – [ ]
4) संतुट्ठ – [ ]

**4 अर्धमागधीत शब्द लिहा.**

1) प्रतिध्वनी 2) क्षमा 3) भगवंत 4) महादेव 5) लालची 6) ज्ञानी

**5 संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

1) 'अहो, सयं भगवं महेसरो वि धणं जायइ। सो मे धणं दाउं कहं पहवेज्जा ।'
2) 'जं जं मम समीवे वट्टइ तं तं सव्वं तव चेव । अहं ते दासो म्हि।'

**6 आकृती पूर्ण करा.**

गोपुरात आलेले तीन लोक → [ ] [ ] [ ]